# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2015-2017

YEAR : 42) 1st October 2017 ( No. of Pages 08 ) ( No : 11


## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## सिनेट व विद्यापरिषद निवडणुक : २०१७

# टीचर्स व ग्रॅज्युएट पॅनेलचा
# जाहीरनामा

*


-लेखन-

**डॉ. प्रवीण रघुवंशी**

अध्यक्ष 'नुटा'


**सिनेट व विद्यापरिषदेमध्ये "नुटा" ने दिलेल्या सूचनांचे पालन करण्यास वचनबद्ध असलेल्या शिक्षक व पदवीधर उमेदवारांचे पॅनेल**

# *शिक्षक व पदवीधर मतदारांना विनंती*

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सिनेट व विद्या परिषदेची निवडणुक रविवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०१७ रोजी होऊ घातली आहे. सिनेट व विद्यापरिषदेमध्ये शिक्षकांच्या व पदवीधरांच्या प्रश्नांवर नुटाने दिलेल्या सूचनांचे पालन करण्यास वचनबद्ध असलेल्या शिक्षक व पदवीधर उमेदवारांचे पॅनेल निवडणुकीसाठी उभे करण्यात आलेले आहे.

शिक्षक व पदवीधर मतदार संघातून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सिनेट व विद्यापरिषदेवर निवडून द्यावयाच्या या जागांसाठी होणाऱ्या मतदानामध्ये या बुलेटीनमध्ये नमूद केलेल्या उमेदवारांना, सूचित केल्याप्रमाणे पसंतीचे क्रमांक देऊन निवडून द्यावे अशी सर्व शिक्षक व पदवीधर मतदारांना विनंती आहे.

**आपले नम्र**

**प्रा.बी.टी.देशमुख**, माजी अध्यक्ष "नुटा"      **डॉ. प्रवीण रघुवंशी**, अध्यक्ष "नुटा"

**प्रा. विवेक देशमुख** — उपाध्यक्ष
**डॉ. पी. एम. तायडे** — कोषाध्यक्ष
**प्रा. सतेश्वर मोरे** — सहसचिव

**प्रा. विवेक हिवरे**      **डॉ. नितीन चांगोले**      **डॉ. संजय देशमुख**      **प्राचार्य शंकर सांगळे**
**डॉ. के. व्ही. बऱ्हाटे**      **प्रा. सुभाष जाधव**      **डॉ. एम. बी. सोनोने**

कार्यकारिणी सदस्य

**प्रा. विलास ठाकरे, अमरावती**      **प्रा. डॉ. अनिल राऊत, अकोला**      **डॉ. विकास टोणे, यवतमाळ**

जिल्हा अध्यक्ष

# मतदानाची पद्धती कशी आहे?

### (A) पदवीधरांसाठी

१. पदवीधरांसाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या एकल संक्राम्य मतदान पद्धतीनुसार जवळ जवळ १६ हजार पदवीधर मतदार १० प्रतिनिधी निवडणार आहेत.

२. यापैकी पाच जागा राखीव आहेत. अनुसूचित जातीतून (S.C.) एक, अनुसूचित जमातीतून (S.T.) एक, विमुक्त जाती/जमातीतून (DT/NT) एक, इतर मागासवर्गीय जातीतून (O.B.C.) एक व महिलातून एक असे हे जागावाटप आहे. त्यामुळे प्रत्येक पदवीधर मतदारास खुल्या जागांसाठी एक, अनुसूचित जातीसाठी एक, अनुसूचित जमातीसाठी एक, विमुक्त जाती/जमातीकरिता एक, महिलांकरिता एक व इतर मागासवर्गीय जातीकरिता एक **अशा एकूण ६ मतदान पत्रिका मिळतील.**

### (B) शिक्षकांसाठी : सिनेट

३. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या एकल संक्राम्य मतदान पद्धतीनुसार जवळ जवळ ३५०० प्राध्यापक मतदार १० प्रतिनिधी निवडणार आहेत. मतदान बिनचूकपणे होण्यास या मतदान पद्धतीविषयी देण्यात आलेली पुढील माहिती आपल्याला उपयुक्त ठरेल.

४. यापैकी पाच जागा राखीव आहेत. अनुसूचित जातीतून (S.C.) एक, अनुसूचित जमातीतून (S.T.) एक, विमुक्त जाती/जमातीतून (DT/NT) एक, इतर मागासवर्गीय जातीतून (O.B.C.) एक व महिलातून एक असे हे जागावाटप आहे. त्यामुळे प्रत्येक शिक्षक मतदारास खुल्या जागांसाठी एक, अनुसूचित जातीसाठी एक, अनुसूचित जमातीसाठी एक, विमुक्त जाती/जमातीकरिता एक, महिलांकरिता एक व इतर मागासवर्गीय जातीकरिता एक **अशा एकूण ६ मतदान पत्रिका मिळतील.**

५. प्रत्येक मतपत्रिकेवर त्या संवर्गांतून उभे असलेल्या सर्व उमेदवारांची नावे राहतील व त्या उमेदवारांच्या नावासमोर आपण पसंतीचे १, २, ३, ४ असे क्रमांक आकड्यात लिहावयाचे आहेत. जितक्या उमेदवारांच्या नावांसमोर क्रमांक लिहिण्याची आपली इच्छा असेल तेवढ्यांच्या नावासमोर आपण क्रमांक लिहू शकता.

## उमेदवारांनी मान्य केलेली निश्चित भूमिका

सिनेट व विद्यापरिषद मध्ये शिक्षकांच्या व पदवीधरांच्या प्रश्नावर नुटाने दिलेल्या सूचनांचे पालन करण्यास वचनबद्ध असलेल्या शिक्षक व पदवीधर उमेदवारांचे हे पॅनेल असेल. पॅनेलमध्ये असलेल्या प्रत्येक उमेदवाराने काही बंधनांचे पालन करावयाचे लेखी स्वरुपात मान्य केलेले आहे. ती बंधने पुढीलप्रमाणे :-

१) प्रत्येक उमेदवार स्वत:साठी पसंतीच्या प्रथम क्रमांकाचे मत मागण्यास व्यक्तिशः मोकळा असेल.

२) स्वत:च्या वैयक्तिक प्रचाराबरोबर पॅनेलमधील सर्व उमेदवारांना पसंतीचे क्रमांक अवश्य द्या अशा प्रकारचा प्रचार करण्याची प्रत्येकावर जबाबदारी असेल.

३) पॅनेलमध्ये नसलेल्या कोणत्याही उमेदवाराचा प्रचार पॅनेलमधील उमेदवार करणार नाही.

४) पॅनेलवर असलेल्या कोणत्याही उमेदवाराला आपण पसंतीचा पहिला किंवा वरचा क्रमांक देणार आहोत असे मतदाराने सांगितल्यास पॅनेलवरील उमेदवार त्याला दुसरा किंवा पसंतीचा पुढील क्रमांक मागतील.

५) पॅनेलवरील अमुक एका उमेदवाराला फारच कमी मते पडतात, तो पडतोच तेव्हा त्याला पसंतीचा प्रथम क्रमांक न देता तो मला द्या असा प्रचार कोणीही उमेदवार करणार नाही.

६) पॅनेलवरील अमुक एका उमेदवाराला जास्त मते मिळतात, तो तर येतोच तेव्हा त्याला पसंतीचा प्रथम क्रमांक न देता तो मला द्या असा प्रचार कोणीही उमेदवार करणार नाही.

उपरोक्त सूचनांचा अव्हेर करून जर पॅनेलवरील एखादा उमेदवार प्रचार करीत असेल तर त्या उमेदवाराला मतदारांनी ताबडतोब हटकले पाहिजे अशी विनंती आहे.

### (C) शिक्षकांसाठी : विद्यापरिषद

६. विद्यापरिषदेवर प्रत्येक शिक्षकांना Science and Technology, Commerce and Management, Humanities व Inter-disciplinary Studies या चार फॅकल्टीकरीता प्रत्येकी दोन उमेदवारांना निवडून द्यावयाचे आहे. यापैकी Science and Technology फॅकल्टीमधून एक जागा खुल्या संवर्गांकरीता तर एक जागा अनुसूचित जातीकरीता (S.C.); Commerce and Management फॅकल्टीमधून एक जागा खुल्या संवर्गांकरीता तर एक जागा अनुसूचित जमातीकरीता (S.T.); Humanities फॅकल्टीमधून एक जागा खुल्या संवर्गांकरीता तर एक जागा इतर मागासवर्गीय जातीकरीता (O.B.C.); Inter-disciplinary Studies फॅकल्टीमधून एक जागा महिलाकरीता तर एक जागा विमुक्त जाती/जमातीकरीता (DT/NT) राखीव आहेत.

विद्यापरिषदेकरीता प्रत्येक शिक्षक मतदाराला वरीलप्रमाणे एकूण आठ मतपत्रिका मिळतील. प्रत्येक शिक्षक मतदाराला या मतपत्रिकेवर संवर्गांनिहाय मतदान करावयाचे आहे.

### (D) सर्वसामान्य सूचना

७. प्रत्येक मतपत्रिकेमध्ये 'पॅनेल' चे जेवढे उमेदवार आहेत त्या सर्व उमेदवारांना आपण पसंतीचे क्रमांक द्यावे, अशी आमची आपणास विनंती आहे. **"मतदान करण्याबाबत आमची विनंती"** मध्ये नमूद केल्याप्रमाणे पसंतीक्रम द्यावे.

८. पसंतीचे क्रमांक मतपत्रिकेवर उमेदवाराच्या नावासमोर नेमून दिलेल्या जागी लिहावयाचे असून ते मराठी, हिंदी, इंग्रजी वा रोमन अंकात लिहावे. अक्षरी मुळीसुद्धा लिहू नये. 'प्रथम', 'व्दितीय' असे लिहू नये. First, Second असे लिहू नये. 1st, 2nd असे सुद्धा लिहू नये. पसंतीचा क्रमांक नोंदतांना तो अंकातच १, २, ३, ४ असा नोंदवावा. आकड्यांना कंसही करू नये.

९. ज्या मतपत्रिकेवर पसंतीचा प्रथम १ क्रमांक अंकात कुणालाच दिला नसेल ती मतपत्रिका रद्द होते हे कृपया लक्षात ठेवा.

१०. पुढील प्रकारच्या मतपत्रिका ह्या वाया जातात हे लक्षात ठेवावे.

(A) If One preference is given to more than one candidate

(B) If Two preferences are given to one candidate.

(C) If Consecutive preferences are not given.

११. मतपत्रिकेवर मतदाराने स्वाक्षरी केली असेल किंवा मत कोणी दिले आहे हे कळू शकेल अशा खाणा-खुणा किंवा खोड-तोड ज्या मतपत्रिकेवर असेल ती मतपत्रिका रद्द होऊ शकते.

१२. मतदान पत्रिकेवर मतदान करताना काही चूक किंवा खोडतोड झाल्यास मतपत्रिका तशीच मतपेटीत टाकू नये. ती मतपत्रिका मतदान अधिकाऱ्याकडून रद्द (Cancel) करून घेऊन दुसरी मतपत्रिका प्राप्त करून घ्यावी.

### आमची विनंती

विद्यापीठाच्या पुढच्या पाच वर्षांच्या कारभाराचे भवितव्य आपल्या या मतदानावर ठरणार आहे, तेव्हा आपण घाईगर्दी न करता मतदान करावे. पॅनेलच्या छापील यादीचा कागद आपणाला पुरविला आहे. पसंतीक्रम ठरविण्यास त्यामुळे आपणास मदत होईल. एक एका संवर्गाची मतपत्रिका मिळाली की त्या संवर्गांतून पॅनेलचे जेवढे उमेदवार आहेत त्यांच्या नावासमोर पसंतीचे क्रमांक आपण टाकावे. (अंकामध्ये, अक्षरात नव्हे)

त्या त्या संवर्गांतून पॅनेलचे जेवढे उमेदवार आहेत त्या सर्वांनाच पसंतीचे क्रमांक द्यावेत अशी आपणास विनंती आहे. पॅनेलमध्ये नसलेल्या कोणत्याही उमेदवाराचा प्रचार (पसंतीच्या कोणत्याही क्रमांकासाठी) पॅनेलचे उमेदवार करणार नाहीत, असे त्यांनी अभिवचन दिले आहे.

शिक्षक व पदवीधर मतदार संघामध्ये कोणत्या संवर्गांतून पॅनेलचे कोण कोण उमेदवार आहेत याची यादी व मतदारांनी तेथे कशाप्रकारे मतदान करावे या बाबतची आमची विनंती याच अंकात स्वतंत्रपणे नमूद केली आहे.

*****

### संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सिनेट व विद्या परिषद निवडणुक : २०१७

# टीचर्स व ग्रॅज्युएट पॅनेलचा जाहीरनामा

**डॉ. प्रवीण रघुवंशी**, अध्यक्ष 'नुटा'

### सिनेटच्या निवडणुकांचे महत्त्व

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सिनेटच्या निवडणुका रविवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०१७ रोजी होऊ घातल्या आहेत. आमच्या सहकारी मित्रांना येत्या सिनेट व विद्या परिषद निवडणुकांमध्ये सर्व शिक्षक व पदवीधर मतदारांनी निवडून द्यावे अशी विनंती करण्यासाठी हा जाहीरनामा प्रसिद्ध केला असून सदरहू निवडणुकांशी संबंधित प्रश्नांची चर्चा पुढील लहान लहान परिच्छेदातून केलेली आहे.

२. अमरावती विद्यापीठाची स्थापना १ मे १९८३ रोजी झाली. आता या गोष्टीला ३४ वर्षे पूर्ण झालेली आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम २८ मध्ये सिनेटची रचना दिली असून कलम २९ मध्ये सिनेटचे अधिकार व कर्तव्ये नमूद केलेली आहेत.

### सिनेटचे अधिकार

**३. अस्तित्वात असलेला स्टॅट्युट रद्द करणे किंवा त्यामध्ये बदल करणे तसेच नवीन स्टॅट्युट तयार करणे हा सिनेटचा अधिकार आहे.** २०१६ च्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्याच्या ५ व्या प्रकरणामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे संलग्न महाविद्यालयातील **शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक जीवनाशी संबंधित कितीतरी महत्त्वपूर्ण बाबींसाठी सिनेटने प्रस्तावित केलेल्या अथवा व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या परिनियमांना अंतिम स्वरूपात मान्यता देण्याचा अधिकार सिनेटचा आहे.** हे चटकन लक्षात यावे म्हणून महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या ७१ व्या कलमातील संबंधित परिच्छेद जसाचा तसा पुढे देत आहोत :-

**71.** Subject to the provisions of this Act, the Statutes may provide for all or any of the following matters, namely:-

(7) norms for grant of autonomy to university departments or institutions, affiliated colleges and recognized institutions, subject to the approval of the State Government;

(9) disciplinary action against defaulting teachers, officers and other employees of the university, affiliated colleges and recognized institutions other than the colleges or institutions managed and maintained by the State Government or Central Government or local authorities;

(14) conditions and procedure for grant of approval to the appointments of the teachers in the colleges and recognized institutions and suspension or withdrawal thereof;

(20) qualifications, recruitment, code of conduct, terms of office, duties and conditions of service including periodic training and advance training, field exposure, deputation, assessment of teachers, officers and other employees of the university and affiliated colleges except those colleges or institutions which are maintained by the State or Central Government or local authority, retirement benefits and the manner of termination of their services as approved by the State Government, provided that these shall not be in contravention of State Government policies in this regard ;

### विद्या परिषदेचे (Academic Council) अधिकार

४. अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमामध्ये बदल करणे, शैक्षणिक दर्जा, संशोधन दर्जा व मूल्यमापन सुधारण्याबाबतची महत्त्वाची मुख्य जबाबदारी विद्या परिषदेवर आहे. याबाबतीत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्याच्या ३२ व्या कलमातील संबंधित परिच्छेद जसाच्या तसा पुढे देत आहोत :-

**32.** (1) The Academic Council shall be the principal academic authority of the university and shall be responsible for regulating and maintaining the standards of teaching, research and evaluation in the university. It shall also be responsible for laying down the academic policies in regard to maintenance and improvement of standards of teaching, research, extension, collaboration programmes in academic matters and evaluation of workload of the teachers.

तसेच विद्या परिषदेला पार पाडावयाची जबाबदारी व कर्तव्ये कायद्याच्या ३३ व्या कलमानुसार खालीलप्रमाणे आहेत :-

**33.** (1) The Academic Council shall have the following powers and duties, namely:

(a) to ensure that the university becomes a vibrant hub for promotion of research and development, interactions and linkages with industries, cultivation of intellectual property rights and entrepreneurship and incubation of knowledge linked industries;

(d) to ensure that the spirit of research and entrepreneurship percolates to all colleges and recognized institutions of the university;

(e) to approve fees, other fees and charges as recommended by the Board of Deans through the fee fixation committee;

(j) to prescribe qualifications and norms for appointment of paper-setters, examiners, moderators and others, concerned with the conduct of examinations and evaluation;

(l) to prescribe norms for recognition of any member of the staff of an affiliated college or recognized institution as a teacher of the university, in consonance with the norms of the University Grants Commission and the State Government;

### स्पष्ट रिक्त पदाची व्याख्या व "परिनियम ५३"

**५. नागपूर विद्यापीठामध्ये स्पष्ट रिक्त पदाची व्याख्या १९२३ ते १९७६ पर्यंत कधीही करण्यात आलेली** नव्हती. चार वर्षे जे पद अस्तित्वात असेल ते पद स्पष्ट रिक्त समजले पाहिजे. स्पष्ट रिक्त पदावर नेमणूक ही प्रोबेशनवरच करण्यात आली पाहिजे. हा दोन वर्षाचा प्रोबेशन काळ संपल्यावर कन्फर्म करण्यात आले पाहिजे व **कन्फर्म केलेल्या शिक्षकाला विद्यापीठाच्या परवानगीशिवाय सेवेतून काढता कामा नये अशा प्रकारचा "परिनियम ५३" नागपूर विद्यापीठामध्ये करण्यात आला.** अशा प्रकारचा परिनियम फक्त नागपूर, अमरावती व गोंडवाना विद्यापीठामध्येच अस्तित्वात आहे हे नमूद करणे आवश्यक आहे. सिनेटवर निवडून गेलेल्या शिक्षक प्रतिनिधींनी मिळविलेली ही महत्वपूर्ण उपलब्धी होती. **१९७६ नंतरच्या काळात शिक्षकांच्या सामायिक हिताच्या विरोधात निर्णय होणार नाहीत अशा प्रकारे विद्यापीठाच्या अधिकारक्षेत्रात असलेल्या न्याय्य तरतुदीसाठी सिनेटवरील शिक्षक प्रतिनिधींनी जागता पहारा ठेवला हे कोणीही नाकबूल करणार नाही.**

सं. गा. बा. अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील एका शिक्षिकेवर तेथील प्राचार्यांनी केलेल्या बडतर्फीला परिनियम ५३ नुसार आव्हान देऊन त्या शिक्षिकेच्या बडतर्फीचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेवर असलेल्या संघटनेच्या प्रतिनिधींनी समर्थपणे भूमिका मांडून फेटाळण्यात यश मिळविले.

६. विद्यापीठ अनुदान आयोगाची नवीन वेतनश्रेणी अंमलात आणण्याविषयी केंद्र शासनाने राज्य शासनाच्या शिक्षण सचिवांना लिहिलेल्या २७ जुलै १९९८ च्या पत्राच्या परिच्छेद ५ मध्ये वेतनपुनर्रचनेच्या योजनेच्या अनेक बाबींचे तपशील हे विद्यापीठांनी स्टॅट्युट करून विहित करावयाचे आहेत असे स्पष्टपणे म्हटलेले आहे. सेवेच्या इतर शर्ती, (Other conditions of service-Probation) सेवा निवृत्ती व सेवा निवृत्तीनंतरची पुनर्नेमणूक, (Superannuation and re-employment) तक्रार निवारण यंत्रणा (Grievance Redressal Mechanism) व व्यावसायिक वर्तनसंहिता (code of professional Ethics) ह्या सर्व बाबी यु.जी.सी.च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यापीठानी स्टॅट्युटव्दारे विहित करावयाच्या आहेत. **स्टॅट्युट तयार करणे हे कायद्याने सिनेटकडे सोपविलेले काम असल्यामुळे सिनेटच्या निवडणुका व त्यातील शिक्षकांचा सहभाग हा किती महत्त्वाचा आहे ही गोष्ट कोणाच्याही सहजपणे लक्षात येईल.**

७. कुलगुरू हे विद्यापीठाचे प्रशासकीय प्रमुख अधिकारी म्हणून कार्य पहात असतात. विद्यापीठाच्या कायद्याने व परिनियमांनी या कामात कुलगुरुंना मदत

करण्यासाठी सहाय्यक कुलसचिवापासून तर कुलसचिवापर्यंत अधिकाऱ्यांचा एक मोठा ताफा दिलेला असतो. शिवाय कायद्याने निर्माण केलेली विद्यापीठाची अनेक प्राधिकरणे आपल्या विधीमय अधिकारांचा वापर करून धोरणात्मक निर्णय घेत असतात. अनेक समित्या या कामी कार्यरत असतात. या प्राधिकरणांचे अनेक सदस्यसुद्धा (पदाधिकारी म्हणून) कुलगुरुंना त्यांच्या कामामध्ये मदत करीत असतात.

**८.** सिनेटमध्ये निवडून गेलेल्या व तेथून व्यवस्थापन परिषदेवर गेलेल्या प्रतिनिधींनी आपल्या २० - २५ वर्षांच्या कार्यकाळात कर्तव्यदक्ष राहून अनेक घातक प्रस्ताव फेटाळून लावले व अतिशय महत्वपूर्ण असे विधायक निर्णय सिनेटमध्ये व व्यवस्थापन परिषदेमध्ये घेतलेत त्यामुळे शिक्षक व विद्यार्थी जगताला न्याय मिळवून देणारे अनेक निर्णय कार्यान्वित झाले. या कार्यकाळातील काही महत्वपूर्ण निर्णय पुढील प्रमाणे :-

(१) नेटसेट ची पात्रता कायदेमान्य नसतांना विधीमय पात्रता धारण करणाऱ्या व विधीवतरित्या नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांना केवळ एका वर्षाची मान्यता देण्याची वहिवाट पडलेली होती. सदर बाब ही नियमबाह्य असल्यामुळे **सत्रांत पद्धतीने मान्यता देणे बंद करून कायम स्वरुपी मान्यता देण्याचा निर्णय** घेतल्यामुळे शेकडो अधिव्याख्यात्यांची अडून राहिलेली प्रकरणे निकालात निघाली व शिक्षकांना न्याय मिळाला.

(२) परीक्षा विभागात **स्वतंत्र प्रबंध शाखा** उघडण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून विविध विद्याशाखातून संशोधनाचे कार्य होत आहे. आचार्य पदवीसाठी संशोधनाचे महत्त्व लक्षात घेवून प्रतिनिधींची एक समिती निर्माण करून तिच्या शिफारसी मान्य करण्यात आल्या व परीक्षा विभागात स्वतंत्र प्रबंध शाखा निर्माण करण्यात आल्याने प्रबंधाच्या संदर्भातील संशोधक विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर झाल्यात व त्यांना न्याय मिळाला.

(३) विद्यापीठाच्या विविध मुद्रण कामांच्या संदर्भात **मुद्रणपूर्ण व्यवस्थेचे आधुनिकीकरण व संगणकीकरण** करण्यात आले. विद्यापीठातील अभ्यासक्रमिकांची जुळवणी विद्यापीठ संगणकावर घेवून नियोजित पद्धतीने मुद्रणपूर्व कामे करून घेण्याचा निर्णय घेतल्याने मुद्रणावरील खर्चात बरीच काटकसर होवू शकली. एवढेच नव्हे तर त्यामुळे अभ्यास क्रमिका विद्यार्थ्यांना वेळेवर उपलब्ध होऊ लागल्या.

(४) विद्यापीठ परिसरामध्ये साठवण **जलाशय व पाणीपुरवठ्याची ब्रृहत योजना** तयार करून कार्यान्वित करण्यात आली.

(५) विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयातील **प्राचार्यांच्या नेमणुका** नियमित नव्हत्या. बहुतांशी महाविद्यालयातील नेमणुका नियमित करण्याच्या दृष्टीने नियमित नियुक्त्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

(६) शिक्षण महर्षि डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने एक समिती नेमण्यात आली. सदर समितीने सादर केलेल्या मुळ प्रस्तावात दुरुस्ती सूचवून शिक्षण महर्षि डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांच्या "The Origin and development of Religion in vedic literature' या **मूळ प्रबंधाच्या प्रति** काढून अभ्यासकांना उपलब्ध करून देण्यात आल्या.

(७) निवड समितीने विधीवतरित्या ज्यांची निवड केलेली आहे अशा **अधिव्याख्यात्यांच्या निवडीला मान्यता मागणाऱ्या प्रस्तावावर एक महिन्याच्या आत निर्णय घेतला पाहिजे** असा दंडक घालून दिला. सदर शिक्षकास मान्यतेच्या पत्राची प्रत पाठवावी.

(८) विद्यापीठातील आर्थिक गैरव्यवहाराला पायबंद घालण्याकरिता शिस्त लावण्याचा प्रयत्न करण्यात आला. **विद्यापीठामध्ये येणारे संपूर्ण शुल्क एकाच ठिकाणी घेण्यात यावे व त्याची संगणकीकृत पावती संबंधीतांना देण्यात यावी ह्या संबंधीचा निर्णय घेण्यात आला.** विद्यापीठामार्फत होणारे सर्व शोधन संगणकीकृत धनादेशाव्दारेच करण्यात यावे असाही निर्णय घेण्यात आला.

(९) विद्यापीठाच्या **संपूर्ण कामकाजाचे संगणकीकरण** करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(१०) विद्यापीठाच्या सर्व परीक्षांचे निकाल हे वेबसाईट द्वारे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले.

(११) परीक्षेतील **गैरव्यवहार प्रकरणे संगणकीय पद्धतीने हाताळण्याची व्यवस्था** स्थापित करण्यात आली. अशा प्रत्येक विद्यार्थ्याला त्याची 'चूक' रजिस्टर्ड पोस्टाने कळवून त्यावर अपिल करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली. संगणकीय व्यवस्थेमुळे अशा प्रकरणात होणारा आपपरभाव पूर्णपणे संपुष्टात आला.

(१२) परीक्षेतील गैरव्यवहार हाताळणीच्या प्रकरणात वर्गीकरण करणाऱ्या शिक्षकांच्या कामाची संगणकीय पद्धतीने प्रतवारी लावण्याचा निर्णय झाला. अशा काम करणाऱ्या एकूण शिक्षकांपैकी कमी दर्जाची कामाची प्रतवारी असलेल्या **शेवटच्या एकतृतियांश शिक्षकांना या कामातून वगळण्यात यावे,** त्यांना ते काम पुन्हा देऊ नये असाही स्थायी निर्णय झाला व गेले अनेक वर्षे त्यांची उत्तमरितीने व निरपवादपणे अम्मलबजावणी सुरु आहे.

(१३) महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये अस्तित्वात असलेली पुनर्मूल्यांकनाची व्यवस्था मा.कुलपती यांनी बंद केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या समोर निर्माण झालेली समस्या लक्षात घेऊन विद्यापीठाने विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती देण्याची पद्धत सुरू केली. तसेच याबाबत आलेल्या तक्रारीचे निवारण करण्याकरिता एक आदर्श तक्रार निवारण पद्धती अस्तित्वात आणली.

(१४) विद्यापीठामध्ये गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या मागासवर्ग कक्षाची गरज लक्षात घेऊन प्राधिकारीणीने सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन अमरावती विद्यापीठामध्ये शासनाच्या वर्ष २००३-२००४ पासून मागासवर्ग कक्षाची स्थापना करण्याचे संदर्भात शासन मान्यता मिळविली व त्याकरिता आवश्यक पदे सुद्धा उपलब्ध करून घेण्यात आली व विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील पाचही जिल्ह्याकरिता विद्यापीठामध्ये मागासवर्ग कक्ष कार्यान्वित करण्यात आला.

(१५) विद्यापीठाच्या परिसरामध्ये अत्याधुनिक सोयी असलेल्या दृकश्राव्य सभागृहाची निर्मिती करण्यात आली, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक परिषदा, कार्यशाळा तसेच चर्चासत्रे आयोजित करण्याकरिता मोठी सोय उपलब्ध झाली. सदर व्यवस्था संलग्नित महाविद्यालयांना सुद्धा उपलब्ध करून देण्यासंबंधिचा निर्णय घेण्यात आला.

(१६) विद्यापीठ परिसरातील भूगर्भामधील कमी होणारी पाण्याची पातळी वाढविण्यासाठी तसेच परिसरातील इमारतींच्या छतावर पडणारे पाणी वाया जावू न देता सरळ विहीर व बोअरवेल मध्ये फिल्टर करून सोडण्यासाठी एकूण १४ इमारतींवर वाटर हार्वेस्टींग सिस्टिम स्थापन करून जलसंधारणाच्या क्षेत्रातील उपयुक्त अशी कामगिरी विद्यापीठ प्राधिकारीणीने पार पाडली.

(१७) विद्यापीठ परिसरामध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता कर्मचारी भवन बांधण्याचा निर्णय घेण्यात आला.

(१८) संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता स्वतंत्र वसतीगृह बांधण्याचा निर्णय घेण्यात आला.

(१९) दि. १२ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयानुसार सहाव्या वेतन आयोगात शिक्षकांची वेतन निश्चितीची जबाबदारी प्रथमच शासनाने विद्यापीठांकडे सोपविली होती. याबाबत योग्य निर्णय घेऊन नुटाच्या व्यवस्थापन परिषदेवरील प्रतिनिधींची संगणक प्रणालीद्वारे वेतन निश्चिती करण्याची यंत्रणा विकसित केली. या यंत्रणेद्वारे बिनचूकपणे सुमारे २२०० चे वर शिक्षकांची वेतननिश्चितीची प्रक्रिया नुटाच्या प्रतिनिधींच्या मार्गदर्शनाखाली बिनचूकपणे व कमी वेळात पार पाडण्यात विद्यापीठाला यश आले. आज रोजी वेतननिश्चितीचे एकही प्रकरण विद्यापीठाकडे प्रलंबित नाही हे सांगतांना अभिमान वाटतो. किंबहुना कमी वेळात बिनचूकपणे व पारदर्शकपणे शिक्षकांची सहाव्या वेतन आयोगात वेतन निश्चिती करण्याचे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ हे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ होते हे ही सांगतांना अभिमान वाटतो.

(२०) तक्रार निवारण समिती व कार्यरत असलेल्या नुटाच्या प्रतिनिधींमुळे तक्रार निवारण समोर सादर झालेली सर्व प्रकरणे (मागील पाच वर्षांच्या कालखंडातील) समितीने दि. ३१-८-२०१५ पूर्वी निकाली काढलेली आहेत.

(२१) विद्यापीठ अनुदान आयोगाने २००६ च्या अधिसूचनेनुसार नेट/सेट ऐवजी UG level ला M.Phil, व PG Level ला Ph.D. ची अर्हता विहित केल्यानंतर अधिव्याख्याते व पदव्युत्तर पदवी धारकांसाठी विद्यापीठामध्ये Vacational M.Phil. सुरू करण्याचा निर्णय हा केवळ संघटनेच्या प्रतिनिधींमुळे शक्य झाला हे सांगतांना आनंद वाटतो.

(२२) मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार नेट/सेट ने प्रभावित शिक्षकांची प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविणे व ८०२ शिक्षकांना सुट मिळाल्यानंतर त्यांची स्थाननिश्चितीची प्रक्रिया संघटनेच्या प्रतिनिधींमुळेच यशस्वीपणे पार पाडण्यात यश आले.

**९.** सहाव्या वेतन आयोगातील इतर अनुषंगिक लाभांच्या बाबतीत (किरकोळ रजा व इतर) शासन आदेशातील किरकोळ रजांच्या संदर्भात नुटाच्या व्यवस्थापन परिषदेवरील प्रतिनिधींनी दिनांक १३ नोव्हेंबर २०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांसाठीच्या रजा विषयक बाबींसाठी अध्यादेश क्रमांक २४ व १२२ मधील तरतुदच लागू राहतील हा धोरणात्मक निर्णय घेतला व याबाबत सर्व रजांच्या बाबतीत एक संघता असण्याबाबत विद्यापीठाच्यावतीने परिपत्रक क्रमांक १/२०१४ दिनांक १६ जानेवारी २०१४ रोजी निर्गमित करून सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आले.

सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीला सुल्तानी संकटाने केवढ्या मोठ्या प्रमाणात घेरलेले आहे याची पुरेशी कल्पना शिक्षकांना आतापर्यंत

आलेली आहे. सातव्या वेतन आयोगाचा अहवाल सादर झाला तरी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या PRC ची नेमणुकसुद्धा करण्यास विद्यापीठ अनुदान आयोगाला केंद्र शासनाने परवानगीच दिली नाही असा प्रकार भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच घडला. देशातील शिक्षकांनी याबाबत आंदोलनाच्या माध्यमातून तीव्र नापसंती व्यक्त केल्यावर PRC नेमल्या गेली. PRC चा अहवाल सादर झाला पण तो प्रकाशितच करावयाचा नाही असाही प्रकार भारताच्या इतिहासात प्रथमच घडलेला आपल्याला दिसून येतो. सातत्त्याने पहिल्या वेतन आयोगापासून तर सहाव्या वेतन आयोगापर्यंत वेतनसुधारणेमुळे येणाऱ्या जादा अर्थभाराच्या ८० टक्के रक्कम राज्यांना अनुदान म्हणून केंद्र शासनाकडून दिली जात होती/दिले जाते. त्यामध्ये मोठी कपात करण्याचा शासनाचा इरादा असल्याच्या बातम्या वृत्तपत्रातून प्रकाशित होत आहेत.

सातव्या PRC चा अहवाल जाहिरच करावयाचा नाही. काय घ्यायचा तो बरावाईट निर्णय मंत्रिमंडळात करून तो वेडावाकडा शासननिर्णयच एकदम जाहिर करावयाचा असे "ऐतिहासिक धोरण" या कृत्यामागे असल्याचे दिसून येते. सातव्या केंद्रीय वेतन आयोगाचा अहवाल सादर झाल्याबरोबर सहा मिनिटांच्या आत संबंध देशभर तो जाहिर होतो पण सातव्या PRC चा अहवाल सादर होऊन सहा महिन्यापेक्षा जास्त काळ झाला तरी तो अहवाल कोणालाही दिसू नये याची काळजी घेण्यात येते. याचा अर्थ काय होतो? मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यावर शासन निर्णय काढावयाचा व "आम्हाला जे काय करायचे होते ते आम्ही केले आहे. आता तुमच्याकडून काय जमेल ते तुम्ही करून घ्या." असा दांडगाईचा संदेश या वृत्तीमागे आहे यापेक्षा वेगळा अर्थ त्यातून निघत नाही आणि त्यातून येणारे संकट एकरूपी नसून बहूरुपी असण्याची शक्यता स्पष्टपणे दिसून येते.

अशा स्थितीमध्ये सुल्तानी समोर माना डोलाविणाऱ्या नॉमिनेटेडच्या गर्दीमध्ये भर घालावयाची की ठामपणे आपले मत मांडणाऱ्या अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ (AIFUCTO) व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (MFUCTO) यांच्याशी ठाम बांधिलकी असलेल्या संघटनेशी बांधिलकी असणाऱ्या उमेदवाराच्या पाठीशी ठामपणे उभे राहायाचे याचा निर्णय व सर्व मतदारांनी करावयाचा आहे.

**१०.** नेट-सेट संदर्भातील संघर्ष सर्वोच्च न्यायालयात सुरू असून त्यासाठी उत्तम गुणवत्ताधारक विधिज्ञांचे बळ संघटनेच्यावतीने न्यायालयीन लढाईसाठी उभे केलेले आहे. ही लढाई आता अंतिम टप्प्यात आली आहे. या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेला निर्णय मान्य करण्यात येईल असे लेखी आश्वासन शासनाने दिलेले असतांना आणि "त्यांची सेवा सर्वच प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यात येईल" असे पत्र विद्यापीठ अनुदान आयोगाने देऊनही त्या पत्राला न जुमानणे आणि आपण संघटनेला दिलेल्या लिखीत बाबी न पाळणे यातून न्यायालयीन लढाईला सुरुवात झाली. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने "प्राध्यापकांना त्यांची सर्व सेवा ग्राह्य धरून त्यांना वेतनाची थकबाकी व्याजासह देण्यात यावी" असा निर्णय दिला. त्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात सरकारने आव्हान दिले आणि महाराष्ट्रातल्या १० हजार शिक्षकांना सर्वोच्च न्यायालयाच्या दारावर नेऊन उभे केले. गेल्या सरकारचे हे पाप पवित्र होऊन आलेल्या नव्या सरकारनेही आपल्या डोक्यावर मिरविण्याची भूमिका घेतली. "लेबल नवे पण द्रव्य जुने" असे एकंदर त्यांच्या वर्तनाचे स्वरूप आहे. किंबहुना त्या सरकारपेक्षाही अत्यंत अनागोंदी या शैक्षणिक व्यवहारात निर्माण करण्याचा त्यांचा डाव आहे. हे नुकत्याच त्यांनी लागू केलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ वरून आपल्या लक्षात येते. लोकशाहीच्या मार्गाने विद्यापीठीय व्यवस्थेत निर्माण केलेली ही हुकूमशाही आहे. नामनिर्देशित व्यक्तिपेक्षा लोकनियुक्त प्रतिनिधींची संख्या कमी करून विद्यापीठाची स्वायत्तता बाधित करण्याचा हा अश्लाध्य प्रकार आहे. हा प्रयत्न वेळीच हाणून पाडणे गरजेचे आहे.

**११.** काहीही कारण नसतांना परीक्षेवरील असहकार आंदोलनातील ७१ दिवसांचे वेतन अडवून ठेवण्याचा अत्यंत असंवेदनशील प्रकार शासनाने केलेला आहे. परीक्षेवरील असहकार आंदोलन मागे घेतल्यानंतर परीक्षेचे काम प्राध्यापकांनी पूर्ण केले. तसे लेखी पत्र विद्यापीठाने शासनाला दिले. तरीही हे वेतन त्यांनी प्राध्यापकांना अदा केलेले नाही. त्यासाठी प्राध्यापकांना उच्च न्यायालयाची पायरी ओलांडावी लागली. दोन वर्षापूर्वी शिक्षक दिनी प्राध्यापकांना "दीन" होऊ देणार नाही अशा बातम्या वर्तमानपत्रात आल्या. प्राध्यापकांना दीन समजणारी हीन प्रवृत्ती जर शासनकर्त्यांची असेल तर या प्रवृत्तीचा बिमोड करणे आवश्यक आहे. हे एक आणि दुसरे असे की, अलिकडेच न्यायालयाने तंबी दिल्यानंतर शासनाने जे आपले म्हणणे (Affidavit) न्यायालयात मांडले आहे. त्यातून त्यांची ही हीन प्रवृत्ती लक्षात येते. त्यांनी सादर केलेल्या आपल्या जबाबात ते म्हणतात, शिक्षकांनी परीक्षेचे काम केले नाही म्हणून "No Work No Pay" च्या धोरणानुसार त्यांना वेतन देण्यात आलेले नाही. ही शासनाची एक बाजू असून दुसऱ्या बाजूला शासनाचे शिक्षणमंत्री गावोगाव सभा घेतात आणि जाहीरपणे "गेल्या सरकारचा हा रडीचा डाव आहे...... शेवटी परीक्षेचे काम त्यांनीच पूर्ण केले ना!" अशी जाहीर कबूली देतात. यावेळी त्यांच्या आजुबाजूला शिक्षण संचालक इतर अधिकारीही उपस्थित असतात. यातील शासनाची बाजू नेमकी कोणती? शिक्षणमंत्री सांगतात ती की, न्यायालयात त्यांनी दाखल केलेल्या ॲफेडेव्हीटमध्ये आहे ती? जाहिरपणे लोकांसमोर जे बोलतो त्याच्या उलट कृती करणारे दुष्टपणाचे धोरण अवलंबणाऱ्या शासनाला सत्यस्थिती दाखविण्याची वेळ आली आहे. ही निवडणूक केवळ आपला प्रतिनिधी निवडून देण्यापुरती नसून या दुटप्पी दुष्ट धोरणाला आमचा विरोध आहे हे स्पष्टपणे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी आपल्या मताचा वापर करण्यासाठी मिळालेली ही संधी आहे. यावेळी आपल्याला ठरवायचे की त्यांची तानाशाही सहन करायची की, स्वाभिमानाने ताठ उभे राहून त्यांचा विरोध करायाचा याचाही निकाल या निवडणूकीत लागणार आहे.

**१२.** केवळ कायद्यात चांगल्या तरतुदी असून भागत नाही तर त्याची उत्तम अंमलबजावणी होण्यासाठी विविध प्राधिकरणावर उत्तम व्यक्ती निवडून जाणे आवश्यक असते. लोकशाही व्यवस्थेमध्ये त्या त्या संस्थांमध्ये काम करणाऱ्या माणसांच्या दर्जावर त्या संस्थांचे भवितव्य अवलंबून असते. उत्तम दर्जाची माणसे विद्यापीठामध्ये विविध पदावर निवडून आली तर त्या माणसांची व त्याबरोबरच त्या पदांची शान वाढते. कमी दर्जाची माणसे निवडून आली तर त्या प्रमाणात त्या त्या पदांचे अवमूल्यन होते. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक सेवाशर्तीबाबत काम करीत असतांना विद्यापीठाच्या या एकंदर व्यवस्थेमध्ये विद्यार्थी हा खरा केंद्रबिंदू राहील ही पॅनेल सदस्यांची सिनेटमध्ये काम करतांनाची श्रद्धा असेल.

**१३.** जात, धर्म किंवा राजकीय पक्ष, विद्यापीठातील गटबाजी यांचा विचार व पर्वा न करता शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या हितसंबंधाची जपणूक करणे ही भूमिका असेल.

**१४.** विद्यापीठाचा कारभार चालत असतांना तो व्यक्तीच्या लहरीनुसार न चालता विधिनियम, परिनियम, अध्यादेश, विनियम, नियम यांच्या आधारेच चालला पाहिजे यावर काटेकोरपणे लक्ष ठेवले जाईल.

**१५.** जागरूकपणे काम करणारा निर्वाचित प्रतिनिधी ही बाजारात उपलब्ध असलेली, खरेदी करता येण्यासारखी वस्तू नसून मतदानाच्या संधीचा उत्तम वापर करणाऱ्या जनसमुहाने त्या संधीच्या माध्यमातून मिळविलेली नियतकालिक उपलब्धी असते. उत्तमरितीने काम करण्याची इच्छा असलेल्या उमेदवारांची एक यादी पदवीधर व शिक्षक मतदार संघातील उमेदवारांच्या निमित्ताने मतदारांच्या समोर आहे.

**१६.** २०१६ च्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यातील तरतूदीनुसार निरनिराळ्या क्षेत्रातील पदवीधरांचे व शिक्षकांचे जे प्रतिनिधी सिनेट व विद्या परिषदेमध्ये पाठवावयाचे आहेत, त्या जागांसाठी आमच्या कांही सहकारी मित्रांचे "शिक्षक व पदवीधर पॅनेल" आपणासमोर आहे. **त्यापैकी आपणास पसंत असलेल्या उमेदवाराला आपण क्रमांक १ द्यावा व पॅनेलमधील इतर सर्व उमेदवारांना पसंतीचे पुढचे क्रमांक द्यावेत. अशी विनंती आहे.**

*- डॉ. प्रवीण रघुवंशी*

*****

## विधीसभा व विद्यापरिषदेवर अविरोध निवडून आलेल्या पुढील उमेदवारांचे हार्दिक अभिनंदन

**SENATE**
Six Representative of Management
(Scheduled Caste Category)

**Kirti Arjun**

**ACADEMIC COUNCIL**
Two Teachers Representing each Faculty in the Faculty of Inter-disciplinary Studies (Women Category)

**Rokade Meena Krushnarao**

Two Teachers Representing each Faculty in the Faculty of Inter-disciplinary Studies (DT/NT Category)

**Rokade Meena Krushnarao**

# POLLING CENTRES WITHIN THE UNIVERSITY AREA

(Sant Gadge Baba Amravati University Notification No. : 126/2017 Date : - 7/9/2017)

(Centre No. Name of the polling centres)

### AMRAVATI DISTRICT

104 Mahatma Fule Arts, Comm. & Sitaramji Choudhary Science College, Warud

106 Adarsha Sci., Jairamdas Bhagchand Arts & Birla Comm. College, Dhamangaon Rly.

107 J.D.Patil Sangludkar Mahavidyalaya, Daryapur

108 Shri Shivaji College of Education, Amravati

109 Jagdamba Mahavidyalaya, Achalpur City

114 Smt. Radhabai Sarda Arts, Commerce & Science Mahavidyalaya, Anjangaon Surji

116 G..S.Tompe Arts, Commerce & Science College, Chandur Bazar

117 Bhagwantrao Shivaji Patil Mahavidyalaya, Paratwada

121 Shri R. R. Lahoti Science College, Morshi

122 Late Shri Madangopalji Mundhada Arts & Commerce College, Chandur Rly.

124 Y. D. V. D. Arts & Commerce College, Tiosa

128 Bar. Ramrao Deshmukh Arts, Smt. Indiraji Kapadiya Commerce & Just. Krishnarao Deshmukh Science College, Badnera Rly

129 Shri Vasantrao Naik Mahavidyalaya, Dharni

138 Prof. Rajabhau Deshmukh Arts College, Nandgaon (Kh.)

139 Sant Gadge Maharaj Arts, Comm. & Science College, Walgaon

145 Mahatma Jyotiba Fule Comm., Sci. & Vitthalrao Raut Arts College, Bhatkuli

155 Arts & Commerce College, Yeoda, Tq.-Daryapur.

159 Dr. Shamaprasad Mukharji Arts College, Shendurjana Ghat

160 Arts & Science College, Kurha, Tq.- Tiosa

163 Arts, Science & Commerce College, Chikhaldara

### AKOLA DISTRICT

203 Shri Shivaji Arts, Commerce & Science College, Akot

204 Shri Gadge Maharaj Mahavidyalaya, Murtizapur

208 Dr. H.N. Sinha Arts & Comm.College, Patur

209 Dr. Gopalrao Khedkar Mahavidyalaya, Gadegaon (Telhara)

210 Shri Radhakisan Laxminarayan Toshniwal Science College, Akola.

215 Gulamnabi Azad Arts, Commerce & Science College, Barshi Takali

216 Dr. Manorama & Prof. Haribhau Shankarrao Pundkar Arts, Commerce & Science College, Balapur

### BULDHANA DISTRICT

302 Jijamata Mahavidyalaya, Buldhana

303 M.E.S. Arts & Commerce College, Mehkar

304 Janta Kala Vanijya Mahavidyalaya, Malkapur

305 G. B. Murarka Arts & Comm.College, Shegaon

306 SPM's Late Tatyasaheb Mahajan Arts & Comm. College, Chikhali.

307 Shripad Krushna Kolhatkar Mahavidyalaya, Jalgaon Jamod.

309 Shri Vyankatesh Arts, Commerce & Science College, Deulgaon Raja.

311 Shri Pundlik Maharaj Mahavidyalaya, Nandura Rly

314 Bhagwan Baba Arts & Commerce College, Lonar.

315 Smt. Surajdevi Ramchandra Mohta Mahila Mahavidyalaya, Khamgaon.

316 Narayanrao Nagre Arts College, Dusarbid.

317 Shri Shivaji Arts, Commerce & Science College, Motala.

336 Late Bhaskarrao Shingane Arts, Prof. Narayanrao Gawande Science & Ashalata Gawande Commerce College, Lavhala Road, Sakharkherda.

### YAVATMAL DISTRICT

403 Lokmanya Tilak Mahavidyalaya, Wani.

404 Phulsingh Naik Mahavidyalaya, Pusad.

405 Bapuraoji Butale Arts, Narayanrao Bhatt Commerce & Bapusaheb Patil Science College, Digras.

406 Nehru Mahavidyalaya (Arts, Commerce & science), Nerparsopant.

407 Gopikabai Sitaram Gawande Mahavidyalaya, Umarkhed.

408 S.P.M. Sci. & Gilani Arts, Commerce College, Ghatanji .

410 Babasaheb Deshmukh Parvekar Mahavidyalaya, Pandharkawada.

412 Loknayak Bapuji Aney Mahila Mahavidyalaya, Yavatmal.

413 Mungsaji Maharaj Mahavidyalaya, Darwha.

414 Indira Mahavidyalaya, Kalamb .

418 Late Rajkamalji Bharti Arts & Smt. Sushilabai R. Bharti Commerce College, Arni .

419 Shri Vitthal Rukhmini Arts, Commerce College, Sawna.

430 Shivshakti Arts & Commerce College, Babhulgaon.

431 Arts, Commerce College, Ralegaon.

434 Arts & Commerce College, Bori Arab.

### WASHIM DISTRICT

701 R.A. Arts, M.K. Commerce & S.R. Rathi Science College, Washim.

702 Kisanlal Nathmal Goenka Arts, Commerce College, Karanja (Lad)

703 Shri Vasantrao Naik Arts & Amar Singh Naik Commerce College, Mangrulpir.

705 Babasaheb Dhabekar Arts & Commerce College, Risod.

706 Smt. Salunkabai Raut Arts, Commerce College, Wanoja, Tq. Mangrulpir.

707 Matoshri Subhadrabai Patil Arts & Late Pandurangji Thakare Commerce College, Manora.

708 Ramrao Zanak Arts & Commerce College, Malegaon

710 Appaswami Mahavidyalaya, Shendurjana (Adhao).

# TEACHERS' PANEL

*(All the names of the candidates are shown in the alphabetical order as are arranged in the University list.)*

**SENATE**

## FIVE GENERAL

Barhate Dr. Kashinath Vinayak
Deshmukh Vivek Shridharrao
Hiware Vivek Haribhau
Kubde Dr. Rajesh Ambadas
Mahure Vinit Ramesh
Mundre Ravindra Narayanrao
Parihar Dr. R.T.
Raghuwanshi P. B.

**मतदान करण्याबाबत आमची विनंती**

**पसंतीक्रम** : मतदारांनी या उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर सर्व उमेदवारांना पसंतीचे पुढचे क्रमांक द्यावेत.

## RESERVED SEATS

**Woman Category : One Member**

Bobade Dr. Archana Devidas — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Scheduled Caste : One Member**

Morey Sateshwar Nagorao — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Scheduled Tribes : One Member**

Sarpate R. M. — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**DT/NT Category : One Member**

Kapse V. D. — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Other Backward Caste : One Member**

Gawande Dr. Subhash Pralahadrao — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

## Academic Council

**Faculty of Science and Tecnology : General**

Chaudhari Dr. Gajanan Niranjanro — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Scheduled Caste : One Member**

Tayade Dr. D. T. (NUTA Supported) — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Faculty of Commerce and Management : General**

Jadhao Subhash Pandurang — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Faculty of Humanities : General**

Sabane Dr. Sujata Balwant — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Faculty of Humanities : Other Backward Caste**

Bhandwalkar Ramdas Bapurao — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**TEACHERS' PANEL**

FIVE GENERAL

Barhate Dr. Kashinath Vinayak
Deshmukh Vivek Shridharrao
Hiware Vivek Haribhau
Kubde Dr. Rajesh Ambadas
Mahure Vinit Ramesh
Mundre Ravindra Narayanrao
Parihar Dr. R.T.
Raghuwanshi P. B.

**RESERVED SEATS**

*Woman Category : One Member*

Bobade Dr. Archana Devidas

*Scheduled Caste : One Member*

Morey Sateshwar Nagorao

*Scheduled Tribes : One Member*

Sarpate R. M.

*DT/NT Category : One Member*

Kapse V. D.

*Other Backward Caste : One Member*

Gawande Dr. Subhash Pralahadrao

***Academic Council***

***Faculty of Science and Tecnology : General***

Chaudhari Dr. Gajanan Niranjanro

***Faculty of Science and Tecnology : Scheduled Caste***

Tayade Dr. D. T.

***Faculty of Commerce and Management : General***

Jadhao Subhash Pandurang

***Faculty of Humanities : General***

Sabane Dr. Sujata Balwant

***Faculty of Humanities : Other Backward Caste***

Bhandwalkar Ramdas Bapurao

***सूचना :*** *(१) वरील टीचर्स व ग्रॅज्युएट पॅनेलच्या यादीतील सर्व उमेदवारांना पसंतीक्रम द्यावे ही विनंती. कोणाला कोणता क्रम द्यावा यासंबंधी मतदाराने घरीच निर्णय घेऊन तसे क्रम वरील उजव्या बाजूच्या यादीवर लिहून घ्यावे. म्हणजे मतदानास वेळ लागणार नाही. (२) आधीच पसंतीक्रम लिहून या पृष्ठावरील उजव्या बाजूची उमेदवारांची यादी मतदान कक्षात नेता येईल. (३) पसंतीक्रम आधीच लिहून नेल्यास प्रत्यक्ष मतदान करणे सोईचे होईल व वेळेची सुध्दा बचत होईल.*

# GRADUATES' PANEL

FIVE GENERAL

**मतदान करण्याबाबत आमची विनंती**

Asole Sanjay Wasudeorao
Boche Vivek Bhimrao
Borde Avinash Madhukarrao
Deoke Abhijit Ramdaspant
Deshmukh Sanjay Bhaurao
Kadu Dilip Bhimraoji
Kadu Gajanan Manikrao
Narale Ritesh Ravindra
Thorat Pradip vishwasrao

**पसंतीक्रम** : मतदारांनी या उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर सर्व उमेदवारांना पसंतीचे पुढचे क्रमांक द्यावेत.

# RESERVED SEATS

**Woman Category : One Member**

Ingale Smita ChandraShekhar — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Scheduled Caste : One Member**

Waghmare Bhimrao Raghunathji — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Scheduled Tribes : One Member**

Parteki Kiran Madhukarrao — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**DT/NT Category : One Member**

Naware Nandkishor Rajaram — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Other Backward Caste : One Member**

Metkar Vidyadhar Madhukarrao — **पसंतीक्रम** : या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

## GRADUATES' PANEL

*Five General*

Asole Sanjay Wasudeorao
Boche Vivek Bhimrao
Borde Avinash Madhukarrao
Deoke Abhijit Ramdaspant
Deshmukh Sanjay Bhaurao
Kadu Dilip Bhimraoji
Kadu Gajanan Manikrao
Narale Ritesh Ravindra
Thorat Pradip vishwasrao

## RESERVED SEATS

*Woman Category : One Member*

Ingale Smita ChandraShekhar

*Scheduled Caste : One Member*

Waghmare Bhimrao Raghunathji

*Scheduled Tribes : One Member*

Parteki Kiran Madhukarrao

*DT/NT Category : One Member*

Naware Nandkishor Rajaram

*Other Backward Caste : One Member*

Metkar Vidyadhar Madhukarrao

***सूचना :*** *(१) वरील टीचर्स व ग्रॅज्युएट पॅनेलच्या यादीतील सर्व उमेदवारांना पसंतीक्रम द्यावे ही विनंती. कोणाला कोणता क्रम द्यावा यासंबंधी मतदाराने घरीच निर्णय घेऊन तसे क्रम वरील उजव्या बाजूच्या यादीवर लिहून घ्यावे. म्हणजे मतदानास वेळ लागणार नाही. (२) आधीच पसंतीक्रम लिहून या पृष्ठावरील उजव्या बाजूची उमेदवारांची यादी मतदान कक्षात नेता येईल. (३) पसंतीक्रम आधीच लिहून नेल्यास प्रत्यक्ष मतदान करणे सोईचे होईल व वेळेची सुध्दा बचत होईल.*

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prin. S. T. Sangle, Bajoriya Nagar, Yavatmal 445 001. Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2015-17 (Uploaded on www.nuta.in on 01.10.2017) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 03.10.2017**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---

To,..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................